महापारेषण
महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित

महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित
अउदा (संवसु) विभाग, धुळे
मानव संसाधन विभाग

Email – ee5220 @ mahatransco. in
URL – www. mahatransco. in

कार्यकारी अभियंता
अउदा (संवसु) विभाग,
१३२ के. व्ही. उपकेंद्र, धुळे परिसर,
मोहाडी, मुंबई -आग्रा रोड, धुळे
जि. धुळे पिन : ४२४३११ (महाराष्ट्र)

संदर्भ : काअ/अउदा/संवसु/वि/धुळे/मासं/ No – 0435 दिनांक :- 04 MAY 2026

महापारेषण
(CIN NO-U40109MH2005SGC153646)
(GST NO-27AAECM2936N1Z2)

## ITI (Electrician) उमेदवारांसाठी सूचना

ITI (Electrician) उत्तीर्ण उमेदवारांना याद्वारे सुचित करण्यात येते की, म.रा. विद्युत पारेषण कंपनी मर्यादित, अउदा संवसु विभाग, धुळे कार्यालयामार्फत सन २०२५ ते २०२६ या कालावधीसाठी सांघिक कार्यालय, मुंबई यांचे मासं परिपत्रक क्रमांक २३०२/१०१ / दि.२२.०६.२०२० नुसार शिकाऊ उमेदवार (Apprentice) उमेदवारांना एक वर्षाच्या प्रशिक्षणासाठी खालील अटी व शर्तीच्या अधीन राहुन करारबध्द करण्यात येणार आहे.

१) **एकूण पदांची संख्या** : ३६

२) **शैक्षणिक पात्रता** : इयत्ता १० वी उत्तीर्ण गुणपत्रक व मान्यताप्राप्त औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचा दोन वर्षाचा आय.टी.आय. इलेक्ट्रीशिअन (वीजतंत्री) उत्तीर्ण केल्याचे सर्व सेमीस्टरचे एकत्रित गुणपत्रक, आधारकार्डसह (सुस्पष्ट स्कॅन कॉपी) अपलोड करणे अत्यावश्यक आहे.

३) अर्जदाराने महाराष्ट्र शासनाच्या www.apprenticeshipindia.org. या वेबसाईटवर नोंदणी करणे बंधनकारक असून दि.११.०५.२०२६ ते १५.०५.२०२६ रात्री २३.५९ पर्यत या कालावधीत https://apprenticeshipindia.org/apprenticeship - /opportunity या लिंकवरुन (Establishment Code – E06212700049) या आस्थापनेवर आवश्यक माहिती नमूद करुन सर्व कागदपत्रांसोबत अर्ज सादर करणे आवश्यक आहे. उपरोक्त नमूद कालावधीनंतर अर्ज करणा-या कोणत्याही उमेदवाराचा अर्ज ग्राहय धरण्यात येणार नाही.

४) आरक्षणाचा लाभ घेणा-या उमेदवाराने ऑनलाईन अर्ज सोबत जातीचे प्रमाणपत्र (सुस्पष्ट स्कॅन कॉपी) सादर करणे आवश्यक आहे.

५) **कामाचे ठिकाण** : धुळे, नंदुरबार जिल्हयातील अउदा संवसु विभाग महापारेषण धुळे अंतर्गत २२० के व्ही / १३२ के व्ही उपकेंद्रात अंतर्गत आणि जळगांव जिल्यातील ता. चाळीसगांव येथे २२० के व्ही / १३२ के व्ही उपकेंद्रा अंतर्गत.

६) **वयोमर्यादा** : वर्ष १८ ते ३० (मागासवर्गीयांसाठी ५ वर्ष शिथिलक्षम)

७) **विद्यावेतन** : शासन व कंपनी नियमाप्रमाणे विद्यावेतन अदा करण्यात येईल.

८) सदर अर्ज फक्त धुळे, नंदुरबार जिल्यातील व जळगांव जिल्यातील चाळीसगांव तालुकातील उमेदवारांना अर्ज करता येईल.

९) प्रशिक्षण घेऊ इच्छिणा-या विद्याध्याने प्रशिक्षण कालावधीत कोणताही तंत्रनिकेतन किंवा अभियांत्रिकी महाविद्यालयात पदवीका / पदवी अभयासक्रमास प्रवेश घेतलेला नसावा.

१०) शिकाऊ प्रतिबध्दता प्रकिया दरम्यान उमेदवाराने राजकीय किंवा इतर अधिका-यांकडुन दबाब आणल्यास संबधीत उमेदवाराची उमेदवारी रद्द करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

११) वरील कागदपत्रे नमूद केलेल्या वेबसाईटवर (सुस्पष्ट स्कॅन कॉपी) अपलोड न उमेदवाराचा पुढील प्रकियासाठी विचार केला जाणार नाही. निवड झालेल्या उमेदवारांना ई- मेलद्वारे कळविणेत येईल. तरी कोणीही महापारेषण कार्यालयास भेट देवू नये. तसेच जाहिरातीमध्ये किंवा जाहिरातीच्या काही भागांमध्ये अंशत: बदल किंवा संपूर्ण जाहिरात रद्द करण्याचे अधिकार हे कंपनी राखून ठेवत आहे. सदरच्या बाबतीत कुठल्याही प्रकारची तक्रार ऐकून घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

१२) शिकाऊ उमेदवाराची प्रशिक्षण कालावधी पुर्ण केल्यामुळे कंपनीमध्ये नोकरी मिळवण्याचा कोणताही अधिकार प्राप्त होत नाही याची कुपया नोंद घ्यावी.

सही
कार्यकारी अभियंता
अउदा संवसु विभाग, धुळे

कुपया वरील रेषेखालील मजकुर छापण्यात येऊ नये

(मिलिंद भामरे)
कार्यकारी अभियंता
अउदा संवसु विभाग, धुळे